0 2 OCT 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद

## मध्यवर्ती युवा महोत्सव : लोकनृत्यामध्ये विवेकानंद व डॉ. साळुंखे महाविद्यालय संयुक्त विजेते

**सकाळ वृत्तसेवा**

आजरा, ता. १ : येथील आजरा महाविद्यालयात झालेल्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. लोकनृत्यामध्ये 'विवेकानंद'सह मिरजेच्या डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालयाने संयुक्त विजेतेपद मिळवले. ज्येष्ठ अभिनेते डॉ. शरद भुताडिया यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके देण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भुताडिया म्हणाले, 'युवा महोत्सवातून कलागुणांना वाव मिळतो. जगत असताना पडलेले प्रश्न व चौकट मोडून टाकण्याची जिद तयार होते.'

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कलेचे संवर्धन व जतन करण्यासाठी हा महोत्सव असल्याचे सांगितले. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. टी. एम. चौगले, विद्यार्थी कलाकार शुभांगी दुबे, संघ व्यवस्थापन प्रतिनिधी मनीषा नाईकवडी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी, व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, सिनेअभिनेत्री रावी किशोर, प्राचार्य डॉ. अशोक सादळे, दीपक बिडकर, संग्राम भालकर आदी उपस्थित होते. डॉ. अशोक बाचुळकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यालयीन अधीक्षक योगेश पाटील यांनी आभार मानले.



आजरा : येथील मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सर्वसाधरण विजेतेपदाचा चषक शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व अभिनेते डॉ. शरद भुताडिया यांच्याकडून स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी. यावेळी उपस्थित अशोक चराटी, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, अभिनेत्री रावी किशोर, प्राचार्य डॉ. अशोक सादळे, दीपक बिडकर, संग्राम भालकर, आदी.

### विविध कलाप्रकारांतील अनुक्रमे विजेते असे

- शास्त्रीय नृत्य- विवेकानंद कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), दुसरा विभागून गाडगे महाराज कॉलेज (कराड) व विलिंग्डन (सांगली).
- नकला- विवेकानंद, श्रीमती नथुबाई गरवारे (सांगली), डीकेटीई (इचलकरंजी).
- एकपात्री अभिनय- सावित्रीबाई फुले (सातारा), शहाजी लॉ कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील (उरुण-इस्लामपूर).
- सुगम गायन- अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, आर्टस् कॉमर्स व सायन्स कॉलेज (पलूस), विभागून न्यू कॉलेज व लालबहादूर शास्त्री कॉलेज (सातारा).
- शास्त्रीय गायन- शिवराज कॉलेज (गडहिंग्लज), चिंतामणराव कॉलेज (सांगली), विभागून शहाजी लॉ कॉलेज व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- पश्चिमात्य एकल गायन - आर्टस्, कॉमर्स कॉलेज (पलूस), कॉमर्स कॉलेज, राजारामबापू इन्स्टिट्यूट (साखराळे).
- शास्त्रीय सुरवाद्य - डीकेटीई (इचलकरंजी), कॉमर्स कॉलेज, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट (कोल्हापूर).
- शास्त्रीय तालवाद्य - यशवंतराव चव्हाण (वारणानगर), यशवंतराव चव्हाण (उरुण - इस्लामपूर), महावीर महाविद्यालय.
- पाश्चिमात्य एकल वादन - वालचंद कॉलेज (सांगली), विवेकानंद, अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- नाट्यसंगीत - विलिंग्डन (सांगली), लालबहादूर शास्त्री (सातारा), अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- एकल लोकल वादन - यशवंतराव चव्हाण (उरुण - इस्लामपूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), आर्टस् व कॉमर्स कॉलेज (नागठाणे).
- स्थळचित्र - डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद, विभागून राजाराम कॉलेज व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- व्यंगचित्र - विवेकानंद , आजरा महाविद्यालय, आनंदराव बी. नाईक (चिखली).
- भितीचित्र- गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड), आनंदराव बी. नाईक (चिखली), डी. डी. शिंदे कॉलेज (कोल्हापूर).
- कातरकाम- गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड), अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम (इचलकरंजी)
- स्थळ छायाचित्रण - यशवंतराव चव्हाण स्कूल (जकातवाडी), प्रा. संभाजीराव कदम कॉलेज (देऊर), यशवंतराव चव्हाण कॉलेज (कोल्हापूर).
- मातीकाम - गाडगे महाराज कॉलेज (कराड), बयाबाई श्रीपती कदम महाविद्यालय (कडेगाव), श्रीमंत भैय्यासाहेब राजमाने (म्हसवड).
- रांगोळी - राजाराम कॉलेज, गाडगे महाराज कॉलेज (कराड), विभागून यशवंतराव चव्हाण (हलकर्णी) व दत्ताजीराव कदम (इचलकरंजी).
- मेहंदी - सावित्रीबाई फुले कॉलेज (सातारा), विभागून गाडगे महाराज कॉलेज (कराड) व गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड), विभागून वेणूताई चव्हाण कॉलेज (कराड) व विजयसिंह यादव (पेठवडगाव).
- वक्तृत्व मराठी - यशवंतराव चव्हाण (वारणानगर), डी. पी. भोसले (कोरेगाव), आनंदराव बी. नाईक (चिखली).
- वक्तृत्व हिंदी - दुधसाखर कॉलेज (बिद्री), विवेकानंद, न्यू कॉलेज.
- वक्तृत्व इंग्रजी - कन्या महाविद्यालय (उरुण-इस्लामपूर), शहाजी लॉ कॉलेज, आर्टस् , कॉमर्स व सायन्स कॉलेज (पुसेगाव).
- लोकनृत्य - विभागून विवेकानंद व डॉ. बापुजी साळुंखे (मिरज), आनंदराव बी. नाईक (चिखली) व आजरा महाविद्यालय, किसन वीर (वाई) व जयसिंगपूर कॉलेज.
- लोककला - दादा पाटील महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विभागून सावित्रीबाई फुले (सातारा) व न्यू कॉलेज, विभागून बळवंत कॉलेज (विटा) व गाडगे महाराज (कराड).
- एकांकिका - कॉमर्स कॉलेज, राजारामबापू इन्स्टिट्यूट (साखराळे), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी).
- लघुनाटिका - न्यू कॉलेज , गाडगे महाराज (कराड), सावित्रीबाई फुले (सातारा).
- मूकनाट्य - आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज (पलूस), यशवंतराव चव्हाण (उरुण, इस्लामपूर), विभागून भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (कोल्हापूर) व गाडगे महाराज (कराड).
- पथनाट्य - गाडगे महाराज (कराड), वेंकटेश्वरा कॉलेज (पेठनाका), कन्या महाविद्यालय (उरुण- इस्लामपूर).
- भारतीय समूहगीत - विवेकानंद, अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विभागून आर्टस्, कॉमर्स कॉलेज (पलूस) व कॉमर्स कॉलेज.
- लोकसंगीत वाद्यवृंद - यशवंतराव चव्हाण (उरुण- इस्लामपूर), अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद.
- पाश्चिमात्य समूहगीत - विवेकानंद, न्यू कॉलेज, दत्ताजीराव कदम (इचलकरंजी)
- सांघिक रचनाकृती - गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड), विभागून अधिविभाग शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद, विभागून न्यू कॉलेज व दत्ताजीराव कदम (इचलकरंजी)
- लघुपट - शहाजी लॉ कॉलेज, गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड), वेणुताई चव्हाण (कराड)
- वादविवाद - कन्या महाविद्यालय (उरुण इस्लामपूर), दुधसाखर (बिद्री), गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेज (कराड)
- प्रश्नमंजुषा - विवेकानंद, बळवंत कॉलेज (विटा), इस्माईल साहेब लॉ कॉलेज (सातारा).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 OCT 2024
पुढारी

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजची बाजी

## आजऱ्यात ४४ व्या मध्यवर्ती महोत्सवाची जल्लोषी सांगता

आजरा : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ व आजरा महाविद्यालय यांच्या संयुक्तपणे आयोजित ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजने शास्त्रीय नृत्य, नकला, व्यंगचित्र स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून विविध स्पर्धेत प्रावीण्य मिळवून मोहोर उमटवली. यावेळी कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांतील गाडगे महाराज, सावित्रीबाई फुले, विलिंग्डन, कर्मवीर भाऊराव पाटील आदी विजेत्या संघांनीही प्रावीण्य मिळवून जल्लोष केला.



आजरा : युवा महोत्सवाचे बक्षीस स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अभिनेते शरद भुताडिया, रावी किशोर, अशोक चराटी आदी.

यावेळी ज्येष्ठ सिने व नाट्य अभिनेते शरद भुताडिया, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. टी. एम. चौगले, मनीषा नायकवडी, शुभांगी दुबे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शास्त्रीय नृत्य स्पर्धेत विवेकानंद कॉलेज (प्रथम), दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय), नकला स्पर्धेत विवेकानंद कॉलेज (प्रथम), मथुरा गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली व डीकेटीई टेक्स्टाईल अँड इन्स्टिट्यूट इचलकरंजी (द्वितीय), एकपात्री अभिनयामध्ये सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा (प्रथम), शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), कर्मवीर भाऊराव पाटील, इस्लामपूर (तृतीय) यांनी क्रमांक मिळविले. एकूण ५३ स्पर्धांमध्ये ३ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन चमक दाखवली.

यावेळी भुताडिया, कुलगुरू डॉ. शिर्के, अभिनेत्री रावी किशोर, जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी आदींच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी रमेश कुरुणकर, विलास नाईक, डॉ. अनिल देशपांडे, ज्योत्स्ना चराटी, प्रा. विजय बांदेकर, अनिकेत चराटी, डॉ. आर. डी. ढमकले, अॅड. एस. जी. परूळेकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अशोक बाचूळकर यांनी सूत्रसंचालन केले. अधीक्षक योगेश पाटील यांनी आभार मानले.

02 OCT 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मध्यवर्ती युवा महोत्सवात 'विवेकानंद'चे वर्चस्व

## विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण : विविध कला प्रकाराचे सादरीकरण

**प्रतिनिधी**
आजरा

शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सव येथील आजरा महाविद्यालयात पार पडला. या महोत्सवात कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावित महोत्सवावरील आपले वर्चस्व कायम ठेवले. कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज उपविजेते ठरले. शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू स्व. डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धेत तसेच अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धेतील सर्वसाधारण विजेत्यापदाचे फिरते चषक विवेकानंद कॉलेजने पटकाविले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. टी. डी. शिर्के होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिनेनाट्य अभिनेते शरद भुताडीया उपस्थित होते. जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी यांच्यासह आजरा महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी आणि दाक्षिणात्य अभिनेत्री वंदना देसाई उर्फ रावी किशोर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आजरा येथे पार पडलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात पारितोषिक वितरण समारंभार सुरुवात झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साह ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले. विविध कलाप्रकारात क्रमांक पटकाविल्याबद्दल आपल्या कॉलेजच्या नावाची घोषणा होताच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा करीत होते. या महोत्सवामध्ये सादर करण्यात आलेल्या ३५ स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर या संपूर्ण स्पर्धेत कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज आणि कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये चुरस पहावयास मिळाली.

या महोत्सवात सादर करण्यात आलेल्या शास्त्रीय नृत्य, नकला, एकपात्री अभिनय, सुगम गायन, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकल गायन, शास्त्रीय सूरवाद्य, शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य एकल वादन, नाट्यसंगीत, एकल लोकवादन, स्थळचित्र, व्यंगचित्र, भितीचित्र निर्मिती, कातरकाम, स्थळ छायाचित्रण, मातीकाम, रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व मराठी, वक्तृत्व हिंदी, वक्तृत्व इंग्रजी, लोकनृत्य, लोककला, एकांकिका, लघुनाटीका, मुकनाट्य, पथनाट्य, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, पाश्चिमात्य समूहगीत, सांघिक रचनाकृती, लघुपट, वादविवाद, प्रश्नमंजुषा स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाच्या कलाकारांनी यश संपादन केले.


आजरा : शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतपद पटकाविलेल्या विवेकानंद कॉलेजच्या कलाकारांचा गौरव करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी उपस्थित मान्यवर

**फिरत्या चषकाचे मानकरी**

कवठे महांकाळ (जि.सांगली) येथील पद्मभूषण वसंतराव दादा पाटील महाविद्यालयाने प्रथम क्रमांकाचा सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक पटकाविला. तर द्वितीय क्रमांकाचा फिरता चषक विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर व शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज यांना विभागून दिला. याबरोबरच विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त देण्यात येणाऱ्या फिरत्याच चषकाचे मानकरी पुढील प्रमाणे, नृत्यविभाग:विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, नाट्यविभाग:सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, संगीत विभाग : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, कला विभाग : गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कराड, वाङ्मय विभाग:श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, उरण–इस्लामपूर यांनी पटकाविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2024
लोकमत



आजरा महाविद्यालयात झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक विवेकानंद कॉलेजच्या संघाला फिरता चषक देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शरद भुताडिया, अशोक चराटी आदी मान्यवर यासह अन्य

# युवा महोत्सवात विवेकानंद महाविद्यालयास विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**आजरा :** आजरा येथे झालेल्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात वैयक्तिक व सांघिक या दोन्ही स्पर्धा प्रकारात कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले.

स्पर्धेतील सर्व विजेत्यांना ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेते शरद भुताडिया, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. डी. टी. शिर्के, जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व फिरता गौरव चषक देऊन गौरविण्यात आले. निकाल जाहीर होताच विजेत्या संघांनी ढोल, हलगी वादन व डॉल्बीच्या ठेक्यावर नृत्य करीत आनंदोत्सव साजरा केला.

युवा महोत्सव म्हणजे नुसताच कलाविष्कार नसून तो आत्माविष्कार आहे. युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते, असे कुलगुरू प्रो. डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. युवकांनी आपल्यातील सुप्त कला गुणांना ओळखून त्याला कलाक्षेत्रात एक वेगळे महत्त्व प्राप्त करून द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते शरद भुताडिया यांनी सांगितले.

कार्यक्रमास जनता एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष विलास नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, सचिव रमेश कुरुणकर, संचालक सुरेश डांग, विजयकुमार पाटील, कृष्णा येसणे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. टी. एम. चौगले, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, विद्यापीठ युवा महोत्सव समितीचे सदस्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.डॉ. अशोक बाचुळकर यांनी केले. तर आभार कार्यालयीन अधीक्षक योगेश पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2024
लोकमत

# पत्रकारिता विद्यार्थ्यांची विद्यापीठात स्वच्छता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने मंगळवारी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. विद्यार्थी आणि शिक्षकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला.

विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी अधिविभागाच्या परिसरात स्वच्छता केली. यावेळी वाढलेले गवत काढण्यात आले. सुका कचरा आणि ओला कचरा वेगळा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा कचराही गोळा केला. विभागाच्या आसपास वाढलेली अनावश्यक झुडपे काढण्यात आली. या मोहिमेत डॉ. शिवाजी जाधव यांच्यासह बॅचलर ऑफ जर्नालिजम, मास्टर ऑफ जर्नालिझमचे विद्यार्थी आणि कार्यालयीन कर्मचारी सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2024
पुढारी

# डिजिटल माध्यमे व कायदे विषयावर आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न डिजिटल मीडिया परिषद, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ रोजी केडब्ल्यूसी कॉलेज, शिवाजीनगर सांगली येथे 'डिजिटल माध्यमे आणि कायदे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा होणार आहे. सहभागी होण्यासाठी विविध माध्यमांच्या १५० हून अधिक पत्रकारांनी नोंदणी केली आहे. कार्यशाळेमध्ये मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव हे 'डिजिटल माध्यमे व भारतीय न्यायसंहिता' या विषयावर, तर महादेव बन्ने हे 'माहिती तंत्रज्ञान कायदा आणि डिजिटल माध्यमे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सहभागी पत्रकारांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शिवराज काटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**विज्ञान-तंत्रज्ञान**

डॉ. व्ही.एन. शिंदे

# पेजरचे स्फोट!

साधारण तीसेक वर्षांपूर्वी पेजर कमरेला लावलेले अनेक मार्केटिंग करणारे प्रतिनिधी दुचाकीवरून फिरायचे. तसे त्या काळी हे तंत्रज्ञान गरिबांच्या आवाक्यात नव्हते. आम्ही आपले असे पेजर कमरेला लावून फिरणारे युवक पाहून थोडेसे नाराज होत असू. आपल्याकडे हे तंत्रज्ञान वापरण्याची कुवत नसल्याचे लक्षात यायचे. पेजर मोजून पंधरा ते वीस वर्षे भारतात मोठ्या थाटात मिरवत होते. पुढे मोबाईल अर्थात भ्रमणध्वनीचे तंत्रज्ञान आले. या तंत्रज्ञानाने पेजर्सना मागे ढकलले. जे तंत्रज्ञान वापरले नाही, त्याची तशी फारशी माहिती मिळवण्याचा प्रयत्न त्या काळी केला नाही. कालबाह्य तंत्रज्ञान शिकावे असे कधी वाटले नाही. पेजरचे तंत्रज्ञान पटकन आले आणि डोळ्याआड गेले असा गैरसमज होता, हे मागील आठवड्यात लेबनॉनमध्ये झालेल्या पेजरच्या साखळी स्फोटाने सिद्ध केले. आजही एवढ्या मोठ्या प्रमाणात पेजर वापरले जातात आणि त्यांचा उपयोग मानवी जीवांना हानी पोहोचवण्यासाठी होतो हे पाहून 'विज्ञान शाप की वरदान' हा शालेय जीवनातील निबंधाचा विषय आठवला.

जेम्स क्लर्क मॅक्सवेल या संशोधकाने सैद्धांतिक संशोधन केले. त्यांनी चार गणिती सूत्रे मांडली. प्रत्यक्षात ही सूत्रे म्हणजे त्याचे नवसंशोधन नव्हते. ॲम्पिअरचा सिद्धांत, फॅराडेचे नियम आणि गॉसचा सिद्धांत याची त्यांनी सांगड घातली. या तीन संशोधकांनी हे नियम एकतर विद्युत किंवा चुंबकीय बलांसाठी मांडले होते. मॅक्सवेल यांनी या सूत्रातून विद्युत आणि चुंबकीय बलांचा परस्पर संबंध मांडला. यातून विद्युतचुंबकीय लहरींचे क्षेत्र प्रयोगासाठी खुले झाले. गॉस, ॲम्पिअर आणि फॅराडेच्या या सूत्रांच्या गुंफणीतून विद्युत ऊर्जेचे विद्युत चुंबकीय लहरीमध्ये रूपांतर करणे आणि त्या पाठवण्यासाठी अँटेना आणि स्वीकारण्यासाठी ग्राहकाची निर्मिती करण्याचे दरवाजे मॅक्सवेल यांच्या संशोधनाने दिसू लागले. यामध्ये निकोला टेस्ला, मार्कोनी, जगदीशचंद्र बोस या संशोधकांनी रेडिओ तरंगांचा वापर करून संदेशवहनाला सुरुवात केली. अर्थात, हे सर्व संशोधन विसाव्या शतकाच्या पूर्वीच सुरू झाले. पुढे यातून रेडिओ संदेशवहन आणि रेडिओ अस्तित्वात आले. पुढे दुसरीकडे दूरदर्शन अर्थात टेलिव्हिजन शोधले गेले. त्याचप्रमाणे वैयक्तिक पातळीवर संदेशवहन करता यावे, यासाठी दूरध्वनी यंत्रणा, वॉकीटॉकी, तसेच तारयंत्रांची रचना तयार झाली. मात्र यातील वॉकीटॉकी, रेडिओ आणि टेलिव्हिजन वगळता अन्य संदेशवहनासाठी तारांचे जाळे आवश्यक होते, ते टाळून संदेशवहन करता यावे यासाठी संशोधन सुरू झाले. यातून अस्तित्वात आले ते पेजर!

पेजरची रचना करण्यामध्ये सर्वप्रथम ए. आय. ग्रॉस यांना यश मिळाले. त्यांनी १९४८ मध्ये प्रथम पेजरवर संदेश पाठवला. हा संदेश अक्षरांच्या रूपात होता. पुढे यामध्ये अक्षरांसोबत अंकही मिसळून पाठवता येणे शक्य झाले. पेजर हे अत्यंत छोटे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. यामध्ये साधारण ४० किलोमीटर अंतरापर्यंत संदेश पाठवता येणे शक्य झाले. यामध्ये एकाने पाठवलेला संदेश, टॉवरवरील ग्राहक स्वीकारून तो संदेश स्वीकारणाऱ्या पेजरपर्यंत पाठवत असे. तो संदेश स्वीकारणाऱ्या पेजरवर बीप-बीप असा संदेश आल्यावर आवाज येत असे. त्यामुळे पेजरला बीपर असेही म्हणत. बीपरचा सर्वप्रथम वैद्यक व्यवसायात वापर सुरू झाला. डॉक्टर्सना रुग्णाची तब्येत बिघडल्यास सत्वर संदेश देण्यासाठी पेजर वापरण्यास सुरुवात झाली. १९९० च्या दशकात भारतात पेजर आले.



व्यावसायिक कारणासाठी पेजर वापरले जाऊ लागले. मात्र, अवघ्या १५-२० वर्षांत मोबाईल तंत्रज्ञान आले. यासाठी उच्च वारंवारितेच्या विद्युत चुंबकीय लहरी वापरल्या जाऊ लागल्या. भ्रमणध्वनीच्या तंत्रज्ञानात झपाट्याने बदल झाले आणि होताहेत. त्या आणखी उच्च वापरताना आता ५-जीचे तंत्रज्ञान विकसीत झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे सर्वसामान्यांच्या आवाक्यात नसणारे पेजर गायब झाले.

मात्र, भ्रमणध्वनीमुळे त्यातही अँड्रॉइड प्रणालीच्या संगणकामुळे आपले सर्वकाही गुगलसारखी कंपनी जाणून घेऊ लागली, त्यामुळे आपल्या हालचालीची नोंद होऊ लागली. आपण कोठे आहोत, काय करतोय हे कोणीतरी पाहू लागले. हे पेजरबाबत नव्हते. त्यामुळे गोपनियता आवश्यक असणाऱ्या लष्करी कारणासाठी आजही पेजर वापरत असल्याचे या स्फोटाने सर्वसामान्यापर्यंत पोहोचवले. लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह ही एक संघटना आहे. तसे लेबनॉनमधील प्रत्यक्ष प्रशासन हीच संघटना चालवते. त्यांच्या सर्व सदस्यांचे परस्परांशी संदेशवहन पेजरच्या माध्यमातून होते. त्यासाठी पाच हजार पेजर अपोलो गोल्ड या कंपनीकडून त्यांनी मागवले. त्यातील तीन हजारपेक्षा जास्त पेजरवर एक विशिष्ट संदेश आला. संदेश आल्याचे पेजरने बीप आवाज करून सांगितले. त्यानंतर पेजरच्या वापरकर्त्यांने काय संदेश आहे, हे पाहण्यासाठी तो पेजर घेतला. अर्थातच हे पाहण्यासाठी तो डोळ्यासमोर घेतला आणि संदेश वाचण्यासाठी बटण दाबताच त्यामध्ये स्फोट झाला. असे एक दोन नव्हे तर तीन हजार पेजरबाबत घडले.

भ्रमणध्वनी किंवा मोबाईल चार्जिंगला लावल्यानंतर अपवादाने असे स्फोट झाल्याचे आपणास ज्ञात आहे. मात्र, अशा घटना अपवादात्मक असतात. या ठिकाणी मात्र स्फोट हे अपवादात्मक नसून, कटाचा भाग असल्याचे स्पष्ट झाले. हे कोणी केले, हा आपल्यासाठी महत्त्वाचा भाग नाही. हे कसे घडवले, हा महत्त्वाचा भाग. या घटनेमध्ये पेजरमध्ये वापरण्यात आलेली बॅटरी आणि प्रणाली दोन्ही बदलण्यात आले. केवळ बॅटरी बदलली असती, बॅटरीमध्ये स्फोटक पेरले असते तर पेजर विशिष्ट काळ सुरू राहिल्यास स्फोट झाले असते, मात्र तसे घडलेले नाही. पेजरमध्ये स्वतंत्र साधारण तीन ग्रॅम स्फोटकांचा छोटा बॉम्ब बसवण्यात आला. पेजरचे वजन २०० ग्रॅमपर्यंत असते. त्या तुलनेत तीन ग्रॅम लक्षात येणे शक्य नव्हते.

त्यामध्ये विशिष्ट संदेश आल्यानंतर तो वाचण्यासाठी कळ दाबताच त्या बॉम्बला विद्युतपुरवठा व्हावा या दृष्टीने त्याच्या कार्यप्रणालीमध्ये बदल करण्यात आले, त्यामुळे एकाच वेळी अनेक पेजरवर विशिष्ट संदेश पाठवण्यात आले. तो वाचण्यासाठी पेजरचे बटण दाबताच स्फोट घडले. अर्थात हे करण्यासाठी पेजर ज्या फ्रिक्वेन्सीवर कार्यरत होते, त्या फ्रिक्वेन्सीमध्ये बाहेरील व्यक्तीने घुसून बाहेरून संदेश पाठवणे गरजेचे होते. हे सर्वकाही करून हे स्फोट झाले. पाठोपाठ वॉकीटॉकी संचामध्येही स्फोट याच तंत्राने घडवले गेले.

मात्र, त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात एक भीती निर्माण झाली. विज्ञान शाप की वरदान हा प्रश्न पुन्हा चर्चेत आणला.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००